# इंद्रधनू मैत्रीचे

आस्था, आणि मानसी. दोघी अगदी जिवलग मैत्रिणी. दोघी पुण्यात एकाच सोसायटीत राहायच्या, एकाच शाळेत जायच्या, आणि एकाच वर्गात होत्या.

आस्थाची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. परंतु मानसीचे वडील एक नावाजलेले डॉक्टर होते, आणि आई एका मोठ्या शाळेत शिक्षिका. त्यामुळे मानसीची परिस्थिती सधन होती.

शाळेमध्ये, आस्था अत्यंत अभ्यासू. मन लावून अभ्यास करणे हा जणू तिचा छंदच. तिला प्रत्येक विषयात उत्तम गुण असायचे, गणित असो व इतिहास. या उलट, मानसीला अभ्यासाची फारशी आवड नव्हती. दोघीही आता नववीत गेल्या होत्या.

---

आज २४ जून, शाळेची फी भरायची शेवटची तारीख. आस्थाकडे पैसे नव्हते, त्यामुळे अजून ती फी भरू शकली नव्हती. शिक्षक सर्वांची फी भरल्याची नोंद करत होते. आस्था डोळे मिटून, मनात देवाचा धावा करत होती. इतर मुलांबरोबर, मानसीचे नाव सरांनी घेतले, आणि तिला वर्गात पाठवले. आस्थाला तिचा थोडा रागच आला. तिच्या मनात आले "इतकी श्रीमंत मुलगी, पण मैत्रिणीला मदत करायला मात्र हात आखडलेले असतात". एवढ्यात सरांनी तिचे नाव पुकारले. आस्थ्याच्या डोळ्यातून घळाघळा पाणी वाहत होते. तिला वाटले की आता आपला अवमान करून, आपल्याला शाळेतून काढून टाकतील. पण झालं उलटच! सर म्हणाले, "काय झालं आस्था? तुझी फी तर भरली आहे. तू वर्गात जाऊन बैस." आस्था हे ऐकून अचंबित झाली. तिचा कानांवर विश्वासच बसत नव्हता.

कोणी बरं फी भरली आपली? शेवटी आस्थाला राहवले नाही. ती थेट शाळेच्या कार्यालयात गेली, आणि तेथील शिक्षिकेला म्हणाली, "मॅडम, नोंदणीपुस्तकात लिहिले असेल ना, माझी फी कोणी भरली ते?" त्यांनी रजिस्टर बघितले, व म्हणाल्या, "नाही बाळा, त्यांनी नाव नाही सांगितलं. पण ते गृहस्थ उंच, बारीक, लांब मिशीवाले होते. त्यांनी पांढरा शर्ट घातला होता." आस्थाला काही लक्षात येईना. कसं शोधणार या वर्णनावरून?

---

आता मानसी आणि आस्था दहावीत होत्या. सगळे अभ्यासावर लक्ष केंद्रित करत होते. आस्थाची आजी आजारी पडली. औषधोपचारात सगळेच पैसे खर्च झाले. आस्थाला हा म्हणजे दुष्काळात तेरावा महिनाच वाटला.

याच वेळी, बाईंनी आस्थाची फी भरली अशी नोंद केली. आस्थाला कळेचना, की ही गूढ, अनामिक व्यक्ती आहे तरी कोण?.

---

काही वर्षांतच, दोघीचे शिक्षण पूर्ण होऊन त्या आपापल्या मार्गाला लागल्या. आस्थाने एका कंपनीत डेटा विश्लेषकाचं काम स्वीकारलं. तिला उत्तम पगार व संधी मिळत होत्या. ती काही काळासाठी चेन्नईला जाऊन राहिली होती.   त्यांच्या नात्यात थोडासा दुरावा आला होता, कारण आस्थाच्या मनात मानसी बद्दल एक अढी होती.

मानसी मात्र पुण्यातच होती. तिला समजले की आस्था सुट्टीसाठी पुण्यात आली आहे. मानसीने तिला फोन केला, व म्हणाली, "कशी आहेस तू? आपण किती वर्ष झाली भेटलोच नाही. उद्या भेटूया का?" आस्थालाही बरे वाटले. ती सकाळी मानसीकडे पोहोचली.

रामू काकांनी दार उघडले. "आस्था, बेटा कशी हाईस तू? इतके दिस कुटं व्हतीस? आता आलीहेस तर बाल मैत्रीनी संग जेवूनच जा बरं."

दोघींनी मनसोक्त गप्पा मारल्या, एकत्र जेवल्या. आस्थाच्या निघायच्या वेळी, पाऊस सुरु झाला. मानसीने ड्राइव्हर काकांना हाक मारून आस्थाला घरी सोडायला सांगितलं.

ड्राइव्हर काका जसे गाडी जवळ आले, तसं आस्था चमकलीच. उंच, बारीक, लांब मिशावाला माणूस ... पांढरा शर्ट. आस्था म्हणाली, "तुमच्या मुलाची शपथ घेऊन सांगा, की माझ्या शाळेच्या फीचे पैसे कोणी भरले?" ते क्षणभर थबकले. पण नंतर म्हणाले, "हो, मीच ते पैसे भरत होतो, मानसी ताईंच्या सांगण्यावरून. त्यांनी मला हे कोणालाही सांगायचे नाही असे बजावले होते. कारण त्यांना तुम्हाला मान खाली घालायला लावायची नव्हती, आणि स्वतःचा मोठेपणाही सिद्ध करायचा नव्हता."

आस्थाच्या डोळ्यांतून अश्रूंची धार लागली. ती गाडीतून उतरली आणि धावत जाऊन मानसी ला बिलगली. दोघी काही बोलत नव्हत्या, पण दोघींनाही एकमेकींना काय म्हणायचे आहे ते कळत होते.

मानसी आस्थाचे डोळे पुसत म्हणाली, "अगं मी हे तुझ्या शिक्षणासाठीच केलं. त्या बदल्यात मला तुझ्या कडून काहीच अपेक्षा नाही. फक्त आपली मैत्री कायम अशीच अतूट राहावी ही मात्र इच्छा आहे". दोघींनी आपल्या नात्याची आता नव्याने सुरवात केली आणि एक-मेकीची साथ कधीच न सोडण्याचं वचन दिले.

---

गाडीत बसल्यावर आस्था विचार करत होती, "मैत्रीत कितीही चढ उतार आले, तरी मैत्रीतला विश्वास किती महत्वाचा आहे! खरंच, जिथे जगातील इतर सर्व नाती संपतात, तिथे सुरु होते तीच खरी मैत्री." तिने समाधानाने आपल्या डोळ्यातले पाणी पुसले.

---

**लेखिकेचे नाव: सायली दर्प**

**वय: १३ वर्षे**

**शाळा: PICT मॉडेल स्कूल**

**इयत्ता: ८ वी, सफायर**

**पालकांचा मोबाईल नंबर: ९८२२२४७९०७**